सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे -४११००१
E-mail: cevt.trti@gmail.com
Website: trti.maharashtra.gov.in
दुरध्वनी - ०२०-२६३३०८५४

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी दिल्ली येथे दिनांक ०९ डिसेंबर, २०२४ पासून सुरू होणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमांच्या योजनेबाबतच्या सर्वसाधारण सूचना**

सन २०२४-२५ पासून महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणांतर्गत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी **दिल्ली मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोग- नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण** कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या पूर्व प्रशिक्षण योजनेच्या लाभार्थी निवडीकरीता सामायिक प्रवेश परीक्षा (CET) घेण्यात आली. सदर सामायिक प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून त्या निकालामध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी विकल्प पोर्टलद्वारे निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेमार्फत **दि.०९ डिसेंबर, २०२४** पासून प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहेत. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाविषयी खालील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. पात्र उमेदवारांनी खालील सूचना काळजीपूर्वक वाचणे अनिवार्य आहे.

१. उमेदवारांना उपरोक्त नमूद पूर्व प्रशिक्षण योजनेसाठी विकल्प पोर्टलच्या माध्यमातून जी प्रशिक्षण संस्था मिळाली आहे त्या प्रशिक्षण संस्थेकडेच प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत वेळोवेळी संपर्क साधावा.

२. सदर योजनेच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी दिलेल्या विहीत कालावधीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येईल.

३. उमेदवाराने प्रवेश घेतल्यावर त्याला संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करणे अनिवार्य आहे. उमेदवाराला प्रशिक्षण कालावधी दरम्यान प्रशिक्षण सोडता येणार नाही.

४. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान उमेदवाराला कुठेही शासकीय/ निमशासकीय नोकरी करता येणार नाही. तसे आढळल्यास किंवा याबाबत या कार्यालयास काही तक्रार प्राप्त झाल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.

५. उमेदवाराने कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर केलेले अनुसूचित जमातीचे जमात वैधता प्रमाणपत्र, इतर सर्व कागदपत्रे व भरून दिलेली माहिती यापैकी काही खोटे आढळल्यास संबंधित उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल. तसेच दरम्यानच्या काळात घेतलेले सर्व लाभ परत करावे लागतील.

६. प्रशिक्षण योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर प्रशिक्षण सोडायचे असल्यास घेतलेले सर्व लाभ, दरम्यानच्या काळात प्रशिक्षण योजनेकरीता झालेला सर्व खर्च आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेला परत करावा लागेल. तसे न केल्यास कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई केली जाईल.

७. उमेदवाराने या संस्थेकडून राबविण्यात आलेल्या कोणत्याही योजनेचा यापूर्वी लाभ घेतला असल्यास सदरच्या उमेदवाराला पुन्हा लाभ घेता येणार नाही. यापूर्वी लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द होईल. तसेच दरम्यानच्या काळात घेतलेले सर्व लाभ परत करावे लागतील.

८. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान उमेदवारांकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन होणार नाही. प्रशिक्षण संस्थेतील सर्व नियमांचे व शिस्तीचे पालन करावे लागेल. तसेच प्रशिक्षण कालावधीमध्ये धुम्रपान/अंमली पदार्थांचे सेवन, मद्यपान, उद्धट वर्तन असे कोणतेही गैर प्रकार केल्यास सबंधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल व कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

९. सर्व प्रशिक्षण योजनेंकरीताच्या विद्यावेतनासाठी किमान उपस्थिती ७५% असणे बंधनकारक राहील. प्रशिक्षण संस्थेकडून प्रशिक्षण काळात दर महिन्याचे बायोमेट्रिक उपस्थिती पत्रक आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस प्राप्त झाल्यावर त्याची पडताळणी करून थेट लाभ अंतरण (DBT) द्वारे उमेदवारांनी दिलेल्या बँक खात्यावर विद्यावेतनाची रक्कम जमा केली जाईल. तसेच प्रशिक्षण कालावधी दरम्यान सबळ कारणास्तव (आजारपण, परीक्षा इ.) रजा घ्यावयाची असल्यास उमेदवाराला प्रशिक्षण

संस्थेस लेखी अर्ज सादर करून त्याबाबतची पूर्व परवानगी घ्यावी लागेल. तसेच संबधित संस्थेला केलेला अर्ज आणि त्यावर संस्थेने दिलेली मान्यता याची स्कॅन कॉपी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेला इ-मेलद्वारे पाठविणे अनिवार्य आहे. जर पूर्व परवानगी न घेता प्रशिक्षण वर्गास अनुपस्थित राहिल्यामुळे जर महिन्याची बायोमेट्रिक उपस्थिती किमान ७५% न भरल्यास त्या महिन्याच्या विद्यावेतनास अपात्र ठरविण्यात येईल. अपवादात्मक परिस्थिती मध्ये प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन अदा करण्याबाबतचा अंतिम निर्णय आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल.

१०. शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या आरक्षणानुसार लाभार्थी संख्येच्या प्रमाणात महिला, दिव्यांग व अनाथ उमेदवारांकरीता जागा आरक्षित ठेवल्या आहेत.

११. प्रशिक्षण योजनेकरीता निवड झाल्यानंतर उमेदवारांनी प्रशिक्षणासाठी तात्काळ रुजू होणे आवश्यक आहे. जर दिलेल्या तारखेपासून ०७ दिवसाच्या उमेदवार आत रुजू झाले नाही अथवा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेशी किंवा प्रशिक्षण संस्थेशी उशिरा रुजू होण्याबाबत संपर्क केला नाही तर त्याजागी निवड यादीतील किंवा प्रतीक्षा यादीतील उमेदवाराची निवड करण्यात येईल.

१२. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभाच्या स्वरूपाची सविस्तर माहिती https://trti.maharashtra.gov.in या संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच योजनांबद्दल नवीन माहिती जाणून घेण्यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी उपरोक्त नमूद संकेतस्थळाला भेट देऊन माहिती घ्यावी.

## प्रशिक्षणार्थींनी घ्यावयाची काळजी

१. दिल्ली करीता जाण्याची व तिथे निवास-भोजनाची सोय व त्याकरीता होणारा खर्च प्रशिक्षणार्थींना स्वतःला करावा लागले.

२. सदरचा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम हा ११ महिन्यांचा व अनिवासी असल्यामुळे प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण सुरु होण्यापूर्वी ज्या प्रशिक्षण संस्थेत प्रवेश निश्चित झाला आहे त्या प्रशिक्षण संस्थेच्या समन्वयकाकडून किंवा पूर्वीच्या विद्यार्थ्यांकडून राहण्याच्या व जेवणाच्या व्यवस्थेबाबत सविस्तर माहिती घ्यावी. त्यानुसार आपल्या जबाबदारीवर राहण्याची व भोजनाची व्यवस्था वेळेत लावून घ्यावी. जेणेकरून प्रशिक्षण कालावधी दरम्यान अडचण निर्माण होणार नाही.

३. प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण संस्थेत रुजू झाल्यानंतर प्रशिक्षण संस्थेकडून प्राप्त अहवालानुसार योजनेतील लाभाच्या स्वरुपात मान्य असलेला जाण्या-येण्याकरीताचा प्रवास खर्च व अनुषंगिक खर्च (पुस्तक संच रक्कम) प्रशिक्षणार्थींना पहिल्या महिन्याच्या विद्यावेतनासोबत प्रशिक्षण संस्थेकडून प्राप्त झालेल्या बायोमेट्रिक उपस्थिती अहवालानुसार थेट लाभ अंतरण (DBT) द्वारे त्यांच्या बँक खात्यात जमा केला जाईल.

४. ज्या विद्यार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते नसेल असा प्रशिक्षणार्थींनी एक महिन्याच्या आत आपले बँक खाते उघडून घ्यावे व त्याचा सविस्तर बँक तपशील या कार्यालयाकडे ई-मेल द्वारे पाठविण्यात यावा.

५. दिल्लीतील वातावरणातील बदलाव लक्षात घेता (कडक थंडी, अति पाऊस, उष्णतेचे प्रमाण) प्रशिक्षणार्थींनी वातावरणाशी साजेशे कपडे, इतर संरक्षणात्मक साहित्य व लागणारी आवश्यक औषधे सोबत घेणे गरजेचे आहे.

६. दिल्लीच्या प्रदूषण पातळीत दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे प्रशिक्षणार्थींनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

७. आरोग्याच्या व सुरक्षितेची जबाबदारी ही प्रशिक्षणार्थींची असेल. काही अडचण उद्भवल्यास प्रशिक्षणार्थींनी तात्काळ संबधित प्रशिक्षण संस्थेशी तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

८. प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण संस्थेतील सर्व नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. प्रशिक्षण संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास संबंधित प्रशिक्षणार्थीचा प्रवेश रद्द केला जाईल.

९. प्रशिक्षण संस्थेबाबत काही तक्रार किंवा अडचण असल्यास प्रशिक्षणार्थींनी लेखी स्वरुपात या कार्यालयास कळवावे.

१०. सदरच्या पूर्व प्रशिक्षण योजनेबद्दल या संस्थेमार्फत वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या सूचना/प्रसिद्धपत्रक यांकरीता प्रशिक्षणार्थींनी https://trti.maharashtra.gov.in या संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट द्यावी.

(डॉ. राजेंद्र भारूड, भा.प्र.से.)
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था**